Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
५३९, राजेंद्रनगर,
कोल्हापूर - ४१६००४

**Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com**

क्र. कोविमं / लेखा / परीक्षा फी / जुलै-ऑगस्ट 2024 / 634 दिनांक : 29 / 05 / 2024

## अत्यंत महत्वाचे

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये
सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हे.

**विषय :** जुलै-ऑगस्ट 2024 **मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्य. प्रमाणपत्र**(इ.12 वी) **पुरवणी परीक्षेचे परीक्षा शुल्क** Bank of India Virtual Account **मध्ये** NEFT/RTGS **द्वारे भरणेबाबत.**
**संदर्भ : राज्य मंडळाचे क्र. रा.मं. / परीक्षा-3 /** 1989, **दिनांक** 24.05.2024 **चे पत्र.**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे नियमित शुल्कानुसार दिनांक 27.05.2024 ते दिनांक 07.06.2024 व विलंब शुल्कानुसार दिनांक 08.06.2024 ते 12.06.2024 या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने सादर करणेकरिता संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

ऑनलाईन आवेदनपत्रे सादर केल्यानंतर बँकेत शुल्क भरण्याच्या तारखां खालीलप्रमाणे आहेत

| | |
|---|---|
| **उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन चलन** Download **करून शुल्क भरण्याच्या तारखां** | **शुक्रवार दिनांक** 31 / 05 / 2024 **ते शनिवार दिनांक** 15 / 06 / 2024 |

या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी आवेदनपत्रे सादर केलेल्या **सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क संगणकीय चलन** Download **करून चलनावरील** Bank of India Virtual Account **मध्ये** NEFT / RTGS **द्वारे भरावयाचे आहे.**

***** लाल चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्यात येवू नये. लाल चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा केल्यास पुन:श्च संगणकीय चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करावा लागेल, याची नोंद घ्यावी.**

तसेच NEFT / RTGS द्वारे परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतरही काही तांत्रिक कारणामुळे परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाच्या बँक खात्यात जमा/वर्ग न होता संबंधित उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या बँक खात्यात परत (Return) जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

***** तरी सर्व उच्च माध्यमिक शाळा/क. महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क** NEFT/RTGS **द्वारे भरणा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी बँक स्टेटमेंटची पडताळणी करून परीक्षा शुल्काची रक्कम परत क. महाविद्यालयाच्या खात्यात जमा/वर्ग झाली नसल्याची खातरजमा करावी. जर परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाच्या** Virtual Account **मध्ये जमा/वर्ग न होता आपल्या खात्यात जमा/वर्ग झाली असल्यास त्वरीत सदर परीक्षा शुल्काची रक्कम संगणकीय चलनावरील** Virtual Account **मध्ये पुन:श्च** NEFT / RTGS **द्वारे भरणा करण्याची दक्षता घ्यावी.**

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

D/Ansar/Letter